दि. ०४/०५/२०२४

दै. गोदातीर

# अट्टल गुन्हेगाराच्या मुसक्या आवळल्या : एलसीबीची कारवाई

नांदेड, दि. ३ : एका खुनासह विविध ठिकाणी घरफोड्या करणाऱ्या फरार अरोपीच्या एलसीबीच्या पथकाने मुसक्या आवळल्या असून सदर अट्टल गुन्हेगाराकडून सोन्याचे दागिने व रोख रक्कम असा एकूण ३ लाख ७५ हजार रुपयाचा मुद्देमाल पोलिसांनी जप्त केला आहे. पुढील तपासासाठी आरोपीला मुखेड पोलिसांच्या ताब्यात देण्यात आले आहे.

नांदेड जिल्ह्यात घडत असलेल्या गुन्ह्यांना आळा घालण्यासाठी व माली गुन्ह्यातील गुन्हेगारांना अटक करण्याबाबत पोलीस अधीक्षक श्रीकृष्ण कोकाटे यांनी संबंधित एलसीबी व पोलीस ठाणे प्रमुखांना आदेशी केले होते. दरम्यान सुमारे आठ वर्षापासून एका खुनाच्या गुन्ह्यातील आरोपी व सुमारे आठ घरफोड्याची नावावर नोंद असलेला अट्टल गुन्हेगार संतोष उर्फ चॉकलेट्या बापुराव भोसले (वय ४५, कुरुळा, ह. मु. वहाद, ता. कंधार) हा त्याच्या राहत्या गावी वहादा येथे असल्याची गुप्त माहिती मिळाल्यानंतर एलसीबीच्या पथकाने सापळा रचून संतोष भोसले यास ताब्यात घेतले. त्याची विचारपूस केली असता मुखेड ठाण्याच्या हद्दीतील, देगलूर व कंधार ठाणे हद्दीत प्रत्येकी एक अशा पाच ठिकाणी घरफोड्या केल्याची कबुली याने पोलिसांसमोर दिली. सदर आरोपीकडून वरील गुन्ह्यातील मुद्देमाल ४८ ग्रॅम सोन्याचे दागिने, २०० ग्रॅम चांदीचे दागिने व नगदी २१ हजार रुपये हस्तगत करण्यात आले.

सदरची कामगिरी पोलीस अधीक्षक श्रीकृष्ण कोकाटे, अ. पो. अ. अबिनाशकुमार, अ. पो. अ. खंडेराय धरणे यांच्या मार्गदर्शनाखाली एलसीबीचे पो. नि. उदय खंडेराय व सपोनि रवी वाहुळे व पथकातील कर्मचाऱ्यांनी केले. सदर आरोपीविरुद्ध एका ट्रक चालकाचा खून केल्याच्या आरोपाखाली विमानळ पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल असून सन २०१६पासून तो फरार होता.

दै. सामना.

# खुनासह आठ घरफोड्यांमध्ये फरार असलेल्या अट्टल आरोपीस अटक



नांदेड, दि.३ (प्रतिनिधी)- खुनासह आठ घरफोड्यांमध्ये फरार असलेल्या अट्टल आरोपीस स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने अटक करून आरोपीकडून वेगवेगळे पाच घरफोडीचे गुन्हे उघडकीस आले आहेत.

**पावणेचार लाखांचा ऐवज जप्त**

नांदेड जिल्ह्यात गेल्या काही महिन्यांत घरफोड्या व खुनाचे गुन्हे दाखल झाल्यानंतर त्याचा तपास वेगाने करण्याच्या सूचना स्थानिक गुन्हे शाखेला देण्यात आल्या होत्या. त्यानुसार स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक उदय खंडेराय, सहायक पोलीस निरीक्षक रवि वाव्हुळे यांच्या पथकाने शोध मोहीम सुरू केली. त्यानुसार वाहद (ता.कंधार) येथे एक खुनाचा गुन्हा व आठ घरफोड्यांच्या गुन्ह्यामधील आरोपी लपून बसल्याची माहिती त्यांना मिळाली. काल रात्री त्याबाबत वाहद (ता.कंधार) येथे सापळा रचण्यात आला. त्यावेळी आरोपी संतोष ऊर्फ चॉकलेट्या बापूराव भोसले (रा.कुरुळा) यास ताब्यात घेण्यात आले. त्याच्याकडे पोलिसी खाक्या दाखवून विचारपूस केली असता मुखेड येथील तीन, देगलूर येथील एक व कंधार येथे एक घरफोडीचा गुन्हा त्याने केल्याचे कबूल केले. आरोपीकडून ४८ ग्रॅम सोन्याचे दागिने, २०० ग्रॅम चांदीचे दागिने व नगदी २१ हजार रुपये, असा ३ लाख ७३ हजार २०० रुपयांचा ऐवज पोलिसांनी जप्त केला असून, पुढील तपास कामी संतोष भोसले यास मुखेड पोलिसांच्या ताब्यात देण्यात आले आहे. पोलीस अधीक्षक श्रीकृष्ण कोकाटे यांनी स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाचे अभिनंदन केले आहे.